## औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या दिनांक 22/10/2003 रोजी सकाळी 11.00 वाजता झालेल्या 130 व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

सदर बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. मा. श्री. के.बी. गवळी. | मुख्य अधिकारी तथा उपसभापती |
| 2. मा. श्री. बबनराव देशमुख | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| 3. मा. श्री. चॉदपाशा इनामदार | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| 4. मा. श्री. मकरंद सावे. | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| 5. मा. श्री. साहेबराव खरात | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| 6. मा. श्रीमती शैलेजा गायकवाड | सदस्या औरंगाबाद मंडळ |
| 7. मा. श्री. संजय वाबचौरे | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| 8. मा. श्री. ॲड. राजेश्वर चव्हाण | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| 9 मा. श्री. ॲड. जे.पी. पाटील | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| 10. मा. श्री. मो. मुदस्सीर, | नगररचनाकार, तथा मा. उपसंचालक, नगररचनाचे प्रतिनिधी |
| 11. मा. श्री. सिकंदरअली, कार्यकारी अभियंता मनपा औरंगाबाद | मा. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे सदस्य प्रतिनिधी |

बैठकीचे कामकाज सुरु करण्यापुर्वी मा. मुख्याधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी सर्व उपस्थित मा. सदस्य यांना माहिती दिली की, मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांना औरंगाबाद येथ येण्यासाठीचे विमान ऐन वेळी चुकल्याने ते येऊ शकले नाहीत. त्यामुळे मा सभपती यांनी दुरध्वनीवरुन सांगितले की, त्यांचे अनुपस्थितीत मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी बैठक घ्यावी..त्यानुसार म्हाड कायदा 1976 मधील कलम 25,26,27 नुसार असलेल्या तरतुदीनुसार मुख्य अधिकारी तथा उपसभापती यांचे अध्यक्षतेखाली मंडळाच्या 130 बैठकीच्या कामकाजास सुरुवात झाली.

बैठकीत मुख्य अधिकारी यांनी सर्व सदस्यांना माहिती दिली की, म्हाडाचे मुंबई येथील उपमुख्य अभियंता कै.श्री. व्ही.एस. देशपांडे यांचे दिनांक 5/10/2003 रोजी अपघातामुळे आकस्मिक दु:खद निधन झाले आहे. त्यामुळे सभागृहात दोन मिनिट स्तब्धता पाळुन कै.श्री.व्ही.एस.देशपांडे, यांना श्रध्दांजली वाहण्यांत यावी असा प्रस्ताव मुख्य अधिकारी, औरंगाबाद मंडळ यांनी मांडला व त्यास मा.श्री.मकरंद सावे सदस्य, औरंगाबाद मडळ यांनी अनुमोदन दिले. त्याप्रमाणे सभागृहामध्ये दोन मिमिट उभे राहुन स्तब्धता पाळण्यात येऊन कै.श्री.व्ही.एस.देशपांडे, यांना श्रध्दांजली अपर्ण करण्यांत आली व त्यानंतर मंडळाच्या पटलावरील विषयानुसार बैठकीच्या कामकाजास सुरुवात झाली.

**विषय क्रमांक : 1.** दिनांक 14/8/2003 रोजी झालेल्या मंडळाच्या 129 व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

दिनांक 14/8/2003 रोजी झालेल्या मंडळाच्या 129 व्या बैठकीच्या कार्यवृत्तांताविषयी विस्तृत माहिती मुख्य अधिकारी यांनी मंडळास दिली. सविस्तर चर्चेअंती दिनांक 14/8/2003 रोजीच्या 129 व्या बैठकीचा कार्यवृत्तांत मंडळाने सर्वानुमते मान्य केला व निर्णय घेता की,

ठराव क्र 773:

दिनांक 14/8/2003 रोजी झालेल्या 129 व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला

**विषय क्र 2 :-** गृहनिर्माण भवनाजवळ सिटी सर्व्हे क्र 20719 इमारत क्र 1 मधील पहिल्या मजल्यावरील 2 हॉल भाडे तत्वावर देणेबाबत.

या विषया बाबत मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, गृहनिर्माण भवनाजवळील इमारत क्रमांक 1 मध्ये दोन हॉल भाडयाने देणेसाठी अदयापही रिक्त आहेत.सदरील हॉलस भाडयाने शासकीय कार्यालयाना देण्यासाठी मा. विभागीय आयुक्त कार्यालयास कळविले होते कोणत्याही शासकीय कार्यालयाची मागणी प्राप्त झाली नाही. त्यामुळे जाहिरात देऊन शासकीय,निमशासकीय व खाजगी कार्यालय व संस्था यांचेकडुन निविदा मागविण्यात आल्या असता त्यासाठी एकंदर 5 निविदा विक्री झाल्या व 4 निविदा भरुन प्राप्त झाल्या .प्राप्त झालेल्या निविदापैकी संजीवन विदया प्रसारक मंडळ नाशिक यांचे निविदा प्रथम क्रमांकावर रुपये 11,111/- दरमहा भाडे, व दुस-या क्रमांकावर असलेले महानायक पब्लीकेशान लि औरंगाबाद यांची निविदा दुस-या क्रमांकावर रुपये 10500/- दरमहा भाडे आहे. मुख्य अधिकारी यांनी अशीही माहिती दिली की, उपरोक्त हॉल्सचा वापर फक्त कार्यालयीन कामासाठी करण्यांत यावा असा जाहिरातीत उल्लेख केलेला असल्यामुळे प्रथम क्रमांकावरील संजीवन विदया प्रसारक मंडळ नाशिक यांना हॉल्स भाडयाने देता येणार नाहीत कारण ते तेथे मुला मुलींना अभ्यासक्रमाविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे असे त्यांनी त्यांचे पत्राद्वारेही मंडळास कळविले आहे. त्यामुळे संजीवन विदया प्रसार मंडळ नाशिक यांनी निविदेत नमुद केलेल्या दरामध्येच रुपये 11,111/- उपरोक्त दोन हॉल महानायक पब्लीकेशान लि यांनी दुस-या क्रमांकावर असलेले निविदाधारक जे की हॉलचा वापर ते दैनिकाच्या मुख्य कार्यालयासाठीच करणार आहेत. त्यांना हॉल भाडयाने देण्यास मंडळाने मान्यता दिल्यास त्याप्रमाणे प्रस्ताव प्राधिकरणास मान्यतेस्तव पाठविण्यांत येईल अशीही माहिती मुख्य अधिकारी यांनी मंडळास दिली. या बाबत मंडळाचे सदस्य ॲड श्री.जे. पी.पाटील व श्री. सावे यांनी विचारणा केली की, उपरोक्त हॉल्स हे फक्त कार्यालयीन कामासाठीच देणे बंधनकारक आहेत काय व हॉल्स संजीवन विदया प्रसार मंडळ नाशिक यांना का देता येत नाहीत याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, जाहिरातीमध्ये फक्त कार्यालयीन कामासाठीच हॉल्स भाडयाने देणेचा उल्लेख आहे त्यामुळे कार्यालयीन कामासाठीच हॉल भाडयाने देणे क्रमप्राप्त आहे. मंडळाचे सर्व मा.सदस्य यांनी एकमताने प्रतिपादन केले की, संजीवन विदया प्रसारक मंडळ नाशिक यांनी निविदेत दिलेल्या दराप्रमाणे भाडे रुपये 11,111/- प्रमाणे महानायक पब्लीकेशन लि. औरंगाबाद हे देण्यास तयार असतील तरी व ते कार्यालयीन कामासाठीच हॉलचा उपयोग करणार असले तरी दोघांचेही म्हणने ऐकुण घेण्यासाठी व भाडे तत्वावर जागा देणसाठीचा निर्णय मंडळास घेता यावा म्हणून प्रथम क्रमांकाचे निविदाधारक व द्वितीय क्रमांकाचे निविदाधारक यांना मंडळाच्या पुढील बैठकीत मंडळासमोर पत्र देऊन बोलविण्यांत यावे म्हणजे त्यांचे म्हणने ऐकुन घेतल्यानंतर सदर विषयावर योग्य तो निर्णय मंडळाच्या पुढील बैठकीत घेण्यांत येईल असेही सर्व मा. सदस्य यांनी सांगितले म्हणून सदर विषय मंडळाच्या पुढील बैठकीत विचारार्थ व निर्णयास्तव ठेवण्यांत यावा असेही बैठकीत सर्वानुमते ठरले.

उपरोक्त प्रमाणे प्रस्तुत विषयावर चर्चा झाल्यानंतर मंडळाने एकमताने निर्णय घेतला की,

**ठराव क्रमांक 774:**

गृहनिर्माण भवनाजवळील सिटी सर्व्हे क्र 20719 मधील इमारत क्र 1 मधील पहिल्या मजल्यावरील 2 हॉल्स भाडे तत्वावर देणेबाबत त्यासाठी प्राप्त झालेल्या प्रथम क्रमांकाचे निविदाधारक संजीवन विदया प्रसारक मंडळ नाशिक व दुस-या क्रमांकाचे निविदाधारक महानायक पब्लीकेशन लि. औरंगाबाद यांना मंडळाच्या पुढील बैठकीत मंडळासमोर त्यांचे म्हणने ऐकण्यासाठी त्यांना पत्र देऊन बोलविण्यांत यावे व सदर विषय मंडळाच्या पुढील बैठकीसमोर पुन्हा विचारार्थ व निर्णयास्तव ठेवण्यांत यावा.

विषय क्र 3 :- राष्ट्रीय झोपडपट्टी सुधारणा योजने अंतर्गत जालना येथील घोषित झोपडपट्टयातील सामाजिक सुविधा अंतर्गत गांधीनगर / बालाजीनगर ढोरपुरा वाल्मीकनगर, कानडीमोहल्ला/ख्रिस्तकॅम्प, गुरुगोविंदनगर, लखकोट/चित्तोडनगर, हनुमान घाट, खांडसारी , राहुलनगर/नुतनवसाहत येथे सामाजिक सुविधांतर्गत सामाजिक सभागृह व प्राथमिक शाळा बांधण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

या विषयाबाबत मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली, मंडळाच्या 129 व्या बैठकीत ठराव क्र 770 प्रमाणे 5 झोपडपट्टीमधील त्या त्या झोपडपट्टयांची लोकसंख्या विचारात घेऊन सामाजिक सुविधा अंतर्गत कामासाठी रु 18,85,710/- एवढया रक्कमेची मंजूरी मंडळाने प्रदान केलेली आहे. व उर्वरीत प्रस्तावास शासनाची मंजूरी आवश्यक असल्याने शासनाकडे सादर करावयाचे ठरले होते. परंतु जालना नगरपरिषदेने सन 1991 ची लोकसंख्यचा विचारात घेऊन जालना शहरातील 12 घोषित झोपडपट्टी लोकसंख्या बाब टिप्पणी समवेत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे विचारात घेऊन सामाजिक सुविधा पुरविण्यासाठी रु 33,27,151/- एवढया रक्कमेच्या कामाचे सुधारीत अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केलेले आहे व एकत्रितपणे सादर केलेले प्रस्ताव रद्द समजण्यांत यावे असेही कळविले आहे. मुख्य अधिकारी यांनी मंडळास अशीही माहिती दिली की, प्रस्तुत सुविधा कामा अंतर्गत सामाजिक सभागृह व प्राथमिक शाळा बांधणेची कामे ही त्या त्या झोपडपट्टयामधील लोकसंख्या विचारात घेऊन प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केलेले असल्याने व अशा प्रस्तावांना बाब टिप्पणीत नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या आधारे प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार क्षेत्रीय मंडळास आहेत. त्यामुळे नगरपरिषदेने उपरोक्त कामासाठी रुपये 33,27,151/- चे अंदाजपत्रक सादर केले आहेत पैकी प्रशासकीय मान्यतेकरिता रुपये 32,91,016/- एवढी रक्कम पात्र ठरते व विषयांकीत प्रस्ताव मंजूर करण्याचे अधिकार मंडळास असल्याने बाब टिप्पणी मंजूरीस्तव मंडळासमोर सादर केली आहे.

याबाबत मंडळाने सर्वानुमते प्रतिपादन केले की, बाब टिप्पणीत नमुद केलेल्या सर्व अटींच्या अधिन राहुन बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे व नगरपरिषद जालनाकडुन आवश्यक त्या सर्व कागदपत्राची पुर्तता करुन घेऊन प्रस्तावित सामाजिक सुविधांच्या कामांना मंजूरी प्रदान करण्यांत यावी. उपरोक्त चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

**ठराव क्र 775:**

**राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रमांतर्गत जालना येथील 12 घोषित झोपडपटटयातील विविध ठिकाणी सामाजिक सभागृह व प्राथमिक शाळा बांधण्याच्या अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 33,27,151/-पैकी फक्त रुपये 32,91,016/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास बाब टिप्पणीत नमुद केलेल्या सर्व अटीच्यां अधिन राहुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येत आहे. आवश्यक कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतरच प्रशासकीय मान्यतेचे आदेश पारीत करण्यांत यावे. स्थायीकरणाची वाट न पहाता पुढील कार्यवाही करावी.**

**विषय क्र 4:** मागणी अभवी रिक्त गाळयांच्या किंमती प्राधिकरणाच्या धोरणानुसार कमी करुन एक रक्कमी खरेदी पध्दतीवर विक्री करणेबाबत.

या विषयीची सविस्तर माहिती मुख्य अधिकारी यांनी मंडळास दिली की, मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, औरंगाबाद येथील

1. 16 गाळे मध्यम उत्पन्न गट गृहनिर्माण भवनाजवळ येथील योजनेतील एक रिक्त गाळा
2. 24 गाळे उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण भवनाजवळील योजनेतील एक रिक्त गाळा व

3. 6 गाळे मध्यम उत्पनन गट सिडको येथील एक रिक्त गाळा असे गाळे ब-याच वर्षापासुन रिक्त होते व त्याची किंमत कमी करुन गाळे विक्री करण्यासाठी जाहिरात देऊन विक्रीसाठी प्रत्यन करण्यांत आले . परंतु उपरोक्त गाळयांना मागणी प्राप्त झाली नाही. म्हणून इया गाळयामध्ये मंडळाचा अडकुन पडलेला निधी मुक्त करण्यासाठी प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सुचनानुसार बाब टिप्पणीत नमुद केल्याप्रमाणे उपरोक्त गाळयांच्या किंमती कमी केलेल्या किंमतीमध्ये आणखी 20 टक्के कमी करुन येणा-या किंमतीत एक रक्कमी पध्दतीवर विक्रीसाठी प्राधिकरणाची मंजूरी घेऊन अशा कमी केलेल्या किंमतीत पुन्हा जाहिरात दिल्यास गाळे विक्री होऊ शकतील अशी माहिती मुख्य अधिकारी यांनी मंडळास दिली.

याबाबत मंडळाने सर्वानुमते प्रतिपादन केले की, गाळयांमध्ये अडकलेला निधी मोकळा होण्याच्या दृष्टीने उपरोक्त योजनेतील रिक्त गाळे आणखी 20 टक्के किंमत कमी करुन विक्री करण्यासाठी प्रस्ताव मंडळाच्या शिफारशीसह प्राधिकरणाकडे पाठविण्यासाठी मान्यता देण्यांत येत आहे. उपरोक्त चर्चेअंती मंडळाने निर्णय घेतला की,

<u>ठराव क्र .776:-</u>

औरंगाबाद मंडळाच्या अखत्यारीतील मागणी अभावी रिक्त असलेले गाळयांमध्ये अडकुन पडलेला निधी मोकळा होण्याच्या दृष्टीने प्राधिकरणाने प्रदान केलेल्या अधिकार प्रदानतेनुसार व मार्गदर्शक सुचनानुसार गाळयांच्या किंमती आणखी 20 टक्के कमी करुन एक रक्कमी खरेदी पध्दतीवर विक्री करणयास खालील प्रमाणे मान्यता देण्यांत येत आहे.

1. 16 गाळे मध्यम उत्पन्न गट ( शहर भूमापन क्रमांक 20719) गृहनिर्माण भवनाजवळ औरंगाबाद या
योजनेतील एक रिक्त गाळा एक रक्कमी पध्दतीवर विक्री करण्यास्तव विक्री किंमत रुपये 2,09,446/-
2. 24 गाळे उच्च उत्पन्न गट (शहर भूमापन क्रमांक 20719) गृहनिर्माण भवनाजवळील योजनेतील एक रिक्त गाळा एक रक्कमी पध्दतीवर विक्री करण्यास्तव विक्री किंत रुपये 3,36,476/-
3.६गाळे मध्यम उत्पनन गट आर 28 एन 7 सिडको औरंगाबाद या योजनेतील एक रिक्त गाळा एक रक्कमी
पध्दतीवर विक्री करण्यास्तव विक्री किंमत रुपये 2,04,000/-

उपरोक्त प्रमाणे कमी केलेल्या गाळयांच्या किंमतीस प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त करुन घेण्यासाठी प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यांत यावा. स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

<u>उपरोक्त प्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर सभेचे अध्यक्ष यांचे परवानगीने सर्व सन्माननीय सदस्यांनी खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित केले.</u>

1. मंडळाचे सदस्य ॲड श्री. जे.पी. पाटील यांनी प्रतिपादन केले की, मुदखेड येथील योजनेत जे गाळे शिल्लक आहे त्यासाठी मागणी आजमाविण्यासाठी जाहिरात दयावी. मुख्य अधिकारी यांनी मिळकत व्यवस्थापक यांना मुदखेड येथील गाळयांसाठी जाहिरात विनाविलंब देण्यासाठी सुचना दिल्या.
2. मंडळाचे सदस्य ॲड श्री. जे.पी. पाटील यांनी प्रतिपादन केले की, अर्धापुर येथे आणखी शिल्लक जमिन आहे म्हणून त्यावर गाळे बांधणेसाठी आणखी योजना तयार करावी व त्यासाठी मागणी आजमाविण्यासाठी देखील कार्यवाही करावी कारण त्या ठिकाणी मागणी मिळु शकेल. मुख्य अधिकारी यांनी बैठकीत सांगितले की, याबाबतीत निश्चीत किती गाळयांसाठी जमिन उपलब्ध आहे याची माहिती घेऊन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

3. मंडळाचे सदस्य ॲड श्री. जे.पी. पाटील यांनी प्रतिपादन केले की मुखेड येथील मंडळाच्या ताब्यातील जमिनीवर विकसीत भूखंडाची योजना घेण्यांत यावी व अशा भूखंडाच्या योजनेसाठी मागणी अंदाज नोंदविण्यासाठीही जाहिरात देण्याची कार्यवाही करावी. याबाबत मुख्य अधिकारी यांनी बैठकीत सांगितले की, मुखेड येथील जमिनीचा ले आऊट सुधारीत करुनघेऊन त्यास नगरपरिषदेचे मंजूरी घेऊन तेथे भूखंडाची योजना हाती घेण्यासाठी कार्यवाही सुरु करण्यांत येईल व तसेच भूखंडाची विक्री किंमत कार्यकारी अभियंता यांचेकडुन प्राप्त झाल्यानंतर भूखंडाची जाहिरात देऊन मागणी अंदाज आजमविण्याचीही कार्यवाही करण्यांत येईल.
4. मंडळाचे सदस्य ॲड श्री. जे.पी. पाटील यांनी प्रतिपादन केले की, मौ.नरशी व मौ.मारताळा जि. नांदेड या दोन्ही ठिकाणी योजना हाती घेण्यासाठी कार्यवाही करावी व योजनेतील गाळयासाठी मागणी अजमाविण्यासाठी जाहिरात देण्याचीही कार्यवाही करावी. मुख्य अधिकारी यांनी संबंधीत उपअभियंता श्री.डेकाटे हे इतर कार्यालयीन कामासाठी उपस्थित असल्याने त्यांना बैठकीमध्ये बोलावुन सुचना दिल्या की, जाहिरात देण्यासाठी गाळयांची विक्री किंमत कार्यकारी अभियंता लातूर यांचेमार्फत तात्काळ सादर करावी. श्री.डेकाटे यांनी बैठकीत सांगितले की, हप्त्याभरात गाळयांची विक्री किंमत कार्यकारी अभियंता ल तूर यांचेकडे सादर करण्यांत येईल. मुख्य अधिकारी यांनी बैठकीत माहिती दिली की, विक्री किंमत प्राप्त झाल्याबरोबर मागणी अंदाज आजमाविण्यासाठी जाहिरात देण्यांत येईल.
5. मंडळाचे सदस्य ॲड श्री. जे.पी. पाटील यांनी प्रतिपादन केले की, देगलुर व हिमायतनगर जि नांदेड येथे मंडळाच्या गृहनिर्माण योजनेसाठी जमिनी मिळविणेसाठी व योग्य जमिनींच्या उपलब्धतेसाठी मंडळाचे अधिकारी यांनी देगलुर व हिमायतनगर येथे जावुन जमिनीची पाहणी करावी व या ठिकाणी गृहनिर्माण योजनेसाठी जमिनी मिळविण्याचा प्रयत्न करावा. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, देगलुर व हिमायतनगर येथे जमिन मिळण्यासाठी प्रयत्न करण्यांत येतील व त्याप्रमाणे मंडळाचे कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांना जमिन मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत म्हणून सूचना देण्यांत येतील.
6. मंडळाचे सदस्य ॲड श्री. जे.पी. पाटील यांनी प्रतिपादन केले की, कौठा नांदेड येथे मंडळाच्या योजनेसाठी अंतर्गत रस्ता तयार करण्यास मागील बैठकीत मंजूरी देऊनही अदयाप काम झाले नाही त्यामुळे सदर अंतर्गत रस्त्याचे काम तात्काळ करुन घेण्यांत यावे. याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, कार्यकारी अभियंता यांना योग्य त्या सुचना देण्यात येतील.
7. मा.श्री.इनामदार सदस्य यांनी सांगितले की, लातूर येथे मंडळाच्या गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी कलम 52 खाली व कलम 41 खाली जमिन संपादन करण्याचे प्रस्ताव तयार करुन जमिन मिळविण्याची कार्यवाही मंडळाच्या अधिका-यांनी करावी. तसेच जमिन मिळण्याचे कामी व संपादनाच्या कामी मंडळाचे स्थानिक सदस्याचे सहकार्य मंडळाच्या अधिका-यांनी घेतल्यास जमिन मिळविण्याचे कामास गती येईल असेही मत मा.श्री. इनामदार व श्री. सावे यांनी व्यक्त केले. यावर मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, लातूर येथे जमिनी मिळविण्यासाठी/संपादनासाठीचे प्रस्ताव तयार करुन विनाविलंब सादर करण्यासाठी व या कामात मंडळाचे स्थानिक सदस्यांचे सहकार्य घेण्यासाठी कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांना सूचना देण्यांत येतील.
8. मा.सदस्य श्री .इनामदार व श्री.वाघचौरे यांनी प्रतिपादन केले की, मंडळाच्या बैठकीत केलेल्या ठरावाप्रमाणे कामे करण्यासाठीची तसेच मंडळाचे स्थानिक सदस्य व कार्यकारी अभियंता यांचा एकमेकात समन्वय सुसंवाद राहणेसाठी चर्चा करणेसाठी संबंधीत कार्यकारी अभियंता/उपअभियंता यांनी स्थानिक मंडळाचे सदस्यासमवेत महिन्यातुन किमान दोनदा चर्चा बैठक घेतल्यास मंडळाचे कामे मार्गी लागतील व अधिकारी व सदस्य यांचेमध्ये समन्वये राहील. म्हणून मुख्य अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता/उप अभियंता यांना तशा सुचना निर्गमीत कराव्यात.मुख्य अधिकारी यांनी बैठकीत माहिती दिली की, वरील बाबतीत कार्यकारी अभियंता/उप अभियंता यांना योग्य त्या सूचना देण्यांत येतील.
9. मंडळाचे मा.सदस्य श्री.वाघचौरे, श्री.इनामदार , श्री. सावे यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, शहानुरवाडी,औरंगाबाद येथील उच्च उत्पन्न गट योजनेचे बांधकाम हे मार्च 03 मध्येच पुर्ण होणे अपेक्षीत होते परंतु ऑक्टो 2003 अखेर पर्यन्तही योजनेतील गाळयांचे बांधकाम पुर्ण झाले नाही व

त्यामुळे योजनातील गाळे विलंबाने लाभार्थींना वाटप झाल्यास योजनेतील लाभार्थीचे व्याजाचे आर्थिक नुकसान झाल्याबद्दल लाभार्थींच्या तक्रारी येतील व त्यांचे झालेले नुकसानाची रक्कम काढुन अशा नुकसानीची जबाबदारी बांधकामाचे ठेकेदारावर निश्चीत करण्यांत यावी.

या विषयी मंडळाचे कार्यकारी अभियंता श्री. पांडे यांनी मंडळास माहिती दिली की, बांधकामाचे ठेकेदार मे.तान्य कन्स्ट्रक्शन यांनी योजनेचे बांधकाम पुर्ण करण्यास अति विलंब लावल्यामुळे त्यांचेवर करारनाम्युनसार दंडात्मक कार्यवाही केली आहे व आता पुन्हा दंड आकारण्यासाठी मा. उपमुख्य अभियंता यांचे मार्फत मुख्य अभियंता प्राधिकरण यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यांत येत आहे. श्री. पांडे यांनी अशीही माहिती दिली की, लाभार्थींना व्याजाचे होणारे नुकसान देण्याची किंवा ते नुकसान किती होईल हे परिगणना करता येणार नाही व तशी तरतुद देखील नाही. श्री. पांडे यांनी सांगितले की, ठेकेदाराकडुन उपरोक्त योजनांचे बांधकाम लवकरात लवकर करुन घेण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे.तथापी , मंडळाचे मा.सदस्य श्री. वाघचौरे, श्री.इनामदार, श्री. राजेश्वर चव्हाण व श्री साबे यांनी सूचना केली की, बांधकामांचे ठेकेदार मे. तान्य कन्स्ट्रक्शन यांचे विरुध्द खालील प्रमाणे कार्यवाही मंडळाचे अधिकारी यांनी करावी.

1. ठेकेदाराला ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्यासाठी कार्यवाही करावी.कारण लाभार्थीचे नुकसान होत आहे.
2. दंडात्मक कार्यवाही रुपये 4000/- प्रतिदिन प्रस्तावित करावी.
3. जोपर्यन्त बांधकाम पुर्ण होत नाही तोपर्यन्त ठेकेदाराला आर.ए.बील देऊ नये व तो कामच करीत नसेल तर त्याचेकडुन काम काढुन घेण्याची कार्यवाही करावी.
4. म्हाडाने यापुढे सदर ठेकेदाराला बांधकामे देऊ नये.
5. लाभार्थीचे होणारे आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करावी.

उपरोक्त बाबतीत मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, ठेकेदाराकडुन काम लवकरात लवकर पुर्ण करण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहेत.तथापी उपरोक्त प्रकरणी मा. सदस्यांनीसुचविलेल्या मुदयांबाबत कार्यकारी अभियंता यांना नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यासाठी सूचना देण्यांत येतील.

10. मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मंडळाचे प्रश्न/समस्या सोडविण्यासाठी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य ,यांचे समवेत एक बैठक आयोजित होणेसाठी मुख्य अधिकारी यांनी पत्र लिहुन बैठकीसाठी मा.मुख्यमंत्री यांची तारीख व वेळ घ्यावी. मुख्य अधिकारी यांनी मंडळास सांगितले की, मा.मुख्यमंत्री महोदय यांचेसमोर मांडणेसाठी सदस्यांनी आवश्यक ते मुद्दे द्यावेत म्हणजे बैठकीसाठी तारीख व वेळ घेण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदयांना पत्र सादर केले जाईल.

11. मंडळाचे सदस्य मा.श्री.खरात यांनी सांगितले की, अंबड येथील गृहनिर्माण योजनेचे काम लवकरात लवकर सुरु करण्यासाठी कार्यवाही करावी. याबाबत मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, जमिनीचा ताबा घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

12. मंडळाचे मा.सदस्य श्री.इनामदार यांनी प्रतिपादन केले की, मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार अतिक्रमनाबाबत जी कार्यवाही सध्या मंडळाने सुरु केली आहे त्याबाबतची माहिती मंडळाचे पुढील बैठकीत देण्यात यावी.

शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानुन बैठक समाप्त झाली.